# मराठी समाजशास्त्र परिषद

**(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र / २७-८३ औरंगाबाद)**

| अध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष |
|---|---|---|
| डॉ. राहुल भगत | डॉ. अशोक बोरकर | डॉ. धनंजय सोनटक्के |
| मो. ९८३४९८८३३७ | मो. ९४२३१०५७८४ | मो. ९८५००२९६९५ |
| rjbhagat1968@yahoo.co.in | A.t_borkar@yahoo.com | dhananjay_dks@rediffmail.com |

## कार्यकारिणी सदस्य

**डॉ. आनंद आंबेकर**
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. किरण सुरवसे**
सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे.

**डॉ. मधुकर चाटसे**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**डॉ. अर्जुन जाधव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**डॉ. हरिदास पेटकर**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**डॉ. रविंद्र वाघ**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**डॉ. प्रवीण घोडेस्वार**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**डॉ. विठ्ठल चव्हाण**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**डॉ. मंगलमुर्ती धोकटे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**डॉ. अमोल पाटील**
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. मारोती बामणे**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.


जावक क्र. मसप/१४/२०२२—२३ दिनांक : ०४/०१/२०२३

प्रति,
मराठी समाजशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननिय सदस्य,
सप्रेम नमस्कार.

मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारा दरवर्षी पुरस्कार देण्यात येतात. २०२२ या वर्षाच्या पुरस्कारासाठी सदस्यांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदस्यांनी पुरस्काराविषयीचे प्रस्ताव दि. **३० जानेवारी २०२३** पर्यत पाठवावेत.

१. **मराठी समाजशास्त्र परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार**: समाजशास्त्र विषयाच्या संदर्भातील योगदानासाठी. सदर पुरस्कारासाठी परिषदेच्या कार्यकारीणी सदस्यांनी आपल्या विद्यापीठातील ०२ ज्येष्ठ प्राध्यापकांची नावे बायोडेटासह पाठवावी.

२. **सौ. प्रतिमा कुलकर्णी 'उत्कृष्ट महिला प्राध्यापक पुरस्कार'**: निकष: सदर पुरस्कारासाठी महिला प्राध्यापक ही वरिष्ठ महाविद्यालयाची नियमित प्राध्यापक असावी. किमान ०२ विद्यार्थी पीएच. डी. प्राप्त, स्वत:चा किमान ०१ ग्रंथ, ०१ संशोधन प्रकल्प व १० शोधनिबंध प्रकाशित असणे आवश्यक आहे.

३. **'डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट प्राध्यापक/संशोधक पुरस्कार'**: निकष: सदर पुरस्कारासाठी समाजशास्त्र विषयाचा नियमित प्राध्यापक असणे आवश्यक आहे. तो स्वत: पीएच. डी. असावा. किमान ०२ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. प्राप्त झालेले असावेत. स्वत:चा किमान ०१ ग्रंथ, ०१ संशोधन प्रकल्प व किमान १० शोधनिबंध आयएसएसएन जर्नल मध्ये प्रकाशित झालेले असावेत.

४. **'डॉ. सुर्यकांत घुगरे समाजशास्त्र संशोधनग्रंथ पुरस्कार' : निकष:** सदर पुरस्कारासाठी सेवेत कार्यरत व पीएच. डी. प्राप्त प्राध्यापक असावा. सदर प्राध्यापकाचा एम. फिल., पीएच. डी. किंवा संशोधन प्रकल्पावरील ग्रंथ, मराठी किंवा इंग्रजीत अनुवादीत केलेला, राज्य/राष्ट्रीय पातळीवरील प्रकाशनाने प्रकाशित केलेला असावा व त्या ग्रंथाला आयएसबीएन क्रमांक असावा. प्रकाशित ग्रंथाला आयसीएसएसआर/युजीसी किंवा शासनमान्य संस्थेद्वारा प्रकाशनासाठी अनुदान मिळाले असल्यास अशा संशोधन ग्रंथाचा सदर पुरस्कारासाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. सदर पुरस्कारासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. सेवेत असणाऱ्या प्राध्यापकांचा संशोधनपर ग्रंथ केंव्हाही प्रकाशित झाला असेल तरी चालेल परंतू तो एम. फिल., पीएच. डी. किंवा युजीसी किंवा आयसीएसएसआर अनुदानीत संशोधन प्रकल्पावरीलच असावा तसेच सबंधीत प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली किमान ०२ विद्यार्थी पीएच. डी. प्राप्त असावे.

५. **'जय जोशी संदर्भ ग्रंथ/क्रमिक ग्रंथ पुरस्कार'**: निकष: ग्रंथ १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रसिध्द झालेला असावा. ग्रंथ वैयक्तिक किंवा संयुक्तिक जास्तीत जास्त २ लेखकांनी लिहलेला असावा. ग्रंथ संपादित नसावा. ग्रंथाला ISBN क्रमांक असणे आवश्यक आहे. लेखकांनी आपल्या ग्रंथाच्या ३ प्रती प्रस्तावासोबत पाठवाव्या.

६. **'डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार'**: निकष: लेख किंवा निबंध ISSN क्रमांक असलेल्या संशोधन पत्रिका (Journal) मध्ये १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रकाशित झालेला असावा. लेखाची ०३ झेरॉक्स कॉपी जर्नलच्या मुखपृष्ठ, अनुक्रमणीका व संपादकीय मंडळाच्या पृष्ठासह पाठवावी.

पुरस्कारासाठी पाठविण्यात येणारे प्रस्ताव/ग्रंथ/लेख **३० जानेवारी, २०२३** पर्यंतच परिषदेच्या खालील पत्यावर स्पीड पोष्टने पाठवावे. या तारखेनंतर आलेल्या प्रस्ताव/ग्रंथ/लेखांचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही. पुरस्कारांसाठी पाठविण्यात येणाऱ्या प्रस्ताव/ग्रंथ/लेखाच्या पाकीटावर तो कोणत्या पुरस्कारासाठी आहे त्याचा स्पष्ट उल्लेख असावा. लेखकाने प्रत्येक पुरस्कारासाठी प्रस्ताव/ग्रंथ/लेखाच्या प्रतीसोबत स्वतंत्र आवेदन परिषदेच्या नांवे करावे. आवेदनात लेखकाचे पूर्ण नांव, महाविद्यालयाचे नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, मोबाईल नंबर व ईमेल इ. चा उल्लेख असावा. पुरस्कार क्र. २, ३ आणि ४ साठी किमान ०२ विद्यार्थी पीएच. डी. प्राप्त असल्याचे विद्यापीठाचे नोटीफिकेशन तसेच ग्रंथ/लेख ०३ प्रती मध्ये पाठवावे. पुरस्कारासाठीचे प्रस्ताव **अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र विभाग, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा पिन: ४४१९१२** या पत्यावर स्पीड पोष्टाने पाठवावे.

| अध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष |
|---|---|---|
| डॉ. राहुल भगत | डॉ. अशोक बोरकर | डॉ. धनंजय सोनटक्के |